भाग ५

।। चिंतनक्षण ।।

डॉ. सुहास पेठे

।। श्री ।।

।। चिंतनक्षण ।।

भाग : ५

डॉ. सुहास पेठे
एम्.ए., पीएच्.डी. (तत्त्वज्ञान)

*** चिंतनक्षण : भाग-५ ***

पुस्तकरूपाने प्रकाशित सातवी आवृत्ती : सप्टेंबर २०१४
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :
वेबसाईट : www.pethekaka.com
युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka
अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

परिस्थितीवर प्रतिक्रिया
देण्यात अडकल्यामुळे
परिस्थितीतून शिकण्याचे
राहून जाते. १२१

अकारण तुलना,अनावश्यक दंभ,अतिरिक्त संचय,अनाठायी टीका, घातक मत्सर - ही सारी बेसावधतेची अपत्ये आहेत.१२२

योग्य एवढेच कर्तव्य
करायचे ठरवले,तर नामाला
आजच्यापेक्षा निदान दुप्पट
वेळ मिळेल.१२३

लीला ही सद्‌गुरूंनी
शिष्यांना शिकण्यासाठी
हेतुतः दिलेली संधी आहे.१२४

भगवंताचे स्वरूप अत्यंत रहस्यमय असले तरी तो दयाळू असल्याने आपल्या प्रिय लेकरांसाठी त्याने आपले स्वरूप निसर्गात व्यक्त करून ठेवले आहे.[१२५]

खरी कृतज्ञता एका पारड्यात
व इतर कुठला सद्‌गुण दुसऱ्या
पारड्यात टाकला, तर
कृतज्ञतेचे पारडे जड राहील.[१२६]

जगात चमत्कार नसतात,
पण आपल्याला न
कळणाऱ्या गोष्टी
असतात.[१२७]

मौनदेवाच्या खऱ्या उपासकाला
जरुरीपुरते व गुरुकृपेने
बोलणेसुद्धा अलंकारासारखे
शोभून दिसते.१२८

परमार्थात यशच यश
कारण यशात प्रगती व
अपयशात शरणागती !१२९

जग पाहाणे वेगळे,
जग कळणे वेगळे.
ज्याला कळते, त्याला ते
फारसे पाहावे लागत नाही.१३०

अहंकार व पैसा हे ज्याला
डावेउजवे विश्वासू साथीदार
वाटतात त्याला असमाधान
अटळ आहे. १३१

भगवंताची कृपा असीम असते, तिला आपल्या कल्पनांचे व विचारांचे बंधारे घालू नयेत. १३२

आधी देवाच्या स्मरणास गरज म्हणून 'उपासनेचे उपक्रम' सुरू होतात, नंतर अनवधानाने 'उपक्रमांची उपासना' सुरू राहाते.१३३

वयाबरोबर आकलनाऐवजी
अहंकारच वाढतो,
ही माणसाची
शोकांतिका आहे. १३४

माझ्या खऱ्या
अस्तित्वाला मृत्यू
हात लावू शकत नाही.१३५

देवाकडून काही मिळवायचे
राहिले नाही, म्हणजे
खऱ्या भक्तीची वाटचाल
सुरू झाली.[१३६]

परिस्थिती म्हणजे आपल्या
कर्मांचा परिणाम व शिकण्याची
संधी असताना,
परिस्थितीबद्दल तक्रार करणे म्हणजे
बेसावधपणा व नुकसान आहे.१३७

आकलन, नम्रता व परिपक्वता यांची वाढ या सुशिक्षितपणाच्या कसोट्या आहेत. १३८

माझ्या प्रतिमेला धक्का म्हणजे
मला धक्का नव्हे हे लक्षात आले
तर बऱ्याच काळज्या, दंभ आणि
संघर्ष कमी होतील.[१३९]

आत्मदर्शनाच्या आरशात पाहिल्यावर अस्वस्थता येणे, ही आत्मदर्शनाची पहिली पायरी आहे.[१४०]

आपले जीवन वजा आपले कळत नकळत स्वार्थ बरोबर शून्य, ही दुर्दैवी वस्तुस्थितीच अनेकांच्या लक्षात येत नाही.[१४१]

नामात एकाग्रता होत नाही, गोडी वाटत नाही म्हणणे म्हणजे शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच विशेष गुणवत्तेच्या प्रमाणपत्राची अपेक्षा करण्यासारखे आहे. १४२

ज्या मनाचे आपण ऐकतो आहोत त्याची अवस्था त्याचे ऐकावे अशी आहे का, हे आधी पहावे. १४३

आपल्या कर्मांच्या मागे इच्छा -वासना तर गुरूंच्या लीलेमागे केवळ हितबुद्धी असते. १४४

विज्ञान पंचेन्द्रियांचे लाड करण्यात गुंतले आहे आणि आम्ही त्या विज्ञानाचे कौतुक करण्यात गुंतलो आहोत, सावधता दोघांनाही गरजेची आहे. १४५

सद्‌गुरू आपल्या अंतरंगाचे
व्यवस्थापन करणे जाणतात,
शिकवतात व करवून
घेतात.[१४६]

आपल्याला जे चांगले शिकायला
मिळते त्याचा निकृष्ट उपयोग
म्हणजे ते अंमलात न आणता
हौसेने दुसऱ्यांना सांगत सुटणे ! १४७

संतचरित्रांतून आपली
परिस्थिती, कुवत व सर्वोच्च
मानवी ध्येय यांची यशस्वी सांगड
कशी घालावी, हे समजते.१४८

स्वत:वरचे आत्यंतिक प्रेम ही
माझ्या अस्वास्थ्याची
मीच केलेली तरतूद आहे.१४९

स्वतःच्या उद्धाराचा कमी होत चाललेला वेळ - हीच जगातली खरी काळजी करण्यासारखी गोष्ट आहे.[१५०]

डॉ. सुहास पेठे यांची ही बोधवचने म्हणजे शुद्ध परमार्थमार्गावरील अभ्यासू व्यक्तींना चिंतनाची एक पर्वणीच होय. कारण या वचनांमागे डॉ. पेठे यांचे तीन तपांचे मूलगामी चिंतन, स्वानुभव, अभ्यास, प्रयोग अशी विस्तृत पार्श्वभूमी आहे. शुद्ध परमार्थाचे आकलन व आचरण यांसाठी त्यांची ही वचने आमच्याप्रमाणे इतरांनाही उपयोगी ठरतील म्हणून संकलित व प्रकाशित होत आहेत.

* संतछाया, सातारा *